# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/ 1204/2024-25**

दि. 29/07/2024

संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/आस्था/2309/2023-24, दि.27/12/2023 रोजीचे परिपत्रक.
2) जा.क्र.मनपा/आस्था/47/2024-25, दि.15/04/2024 रोजीचे परिपत्रक.
3) जा.क्र.मनपा/आस्था/246/2024-25, दि.27/05/2024 रोजीचे परिपत्रक.
4) जा.क्र.मनपा/आस्था/468/2024-25, दि.21/06/2024 रोजीचे परिपत्रक.

## परिपत्रक

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर विविध विभागात ठेका पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणेबाबत संबंधित ठेकेदार यांना अवगत करणेबाबत सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना यापुर्वीच संदर्भिय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत काही ठेका कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी झालेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

जोपर्यंत ठेका कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी अहवाल सादर होत नाही तोपर्यंत त्यांना कामावर हजर करुन घेण्यात येऊ नये, असे सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात आले होते.

तरी ज्या ठेका कर्मचाऱ्यांनी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, अशा ठेका कर्मचाऱ्यांना दि.01/08/2024 रोजी पासून कामावरुन कमी करण्यात यावे व तसा अहवाल इकडील विभागास सादर करण्यात यावा.

जे ठेका कर्मचारी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर न करुनसुध्दा अद्याप कार्यालयात उपस्थित राहून कामकाज करीत आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी संबंधित विभागप्रमुख यांची राहील, याची नोंद घ्यावी.

29.7.24

(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
उप-आयुक्त (सर्व)